आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक

# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष १० वे ● अंक २५० वा ● बुधवार २४ जून २०२६ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




# महाराष्ट्रातील सात मान्यवरांना ‘पद्म’ पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली, दि. २३ : देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या ‘पद्म पुरस्कारांचे’ वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील ‘गणतंत्र मंडप’ येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन , प्रधान मंत्री नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.

पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्र्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. १६ हून अधिक भाषांमध्ये २ हजारांपेक्षा अधिक गीते गाऊन त्यांनी भारतीय संगीत क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

सहा मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार

क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ‘हिटमॅन’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्मा



यांनी भारतीय क्रिकेटला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत.

वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री प्रदान करण्यात आला. भारतातील नवजात शिशुवैद्यकशास्त्राच्या अग्रणी तज्ज्ञांपैकी एक असलेल्या डॉ. फर्नांडिस यांनी १९८९ मध्ये मुंबईतील सायन रुग्णालयात आशियातील पहिली मानवी दूध बँक सुरू केली. अकाली आणि दुर्बल नवजात बालकांचे प्राण वाचविण्यात त्यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे.

वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. बांबू आणि सुक्या भोपळ्यापासून तयार होणारे सुमारे १० फूट लांबीचे तारपा वाद्य वाजविण्याच्या त्यांच्या कौशल्याला राष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आले.

अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ‘अलैपायुथे’, ‘रहना है तेरे दिल में’, ‘थ्री इडियट्स’, ‘तनू वेड्स मनू’, ‘विक्रम वेधा’ यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभिनयाला प्रेक्षकांनी विशेष पसंती दिली आहे. ‘रॉकेट्री : द नंबी इफेक्ट’ या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली.

ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या तिन्ही माध्यमांमध्ये चार दशकांहून अधिक काळ त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्यावतीने हा पुरस्कार त्यांचे बंधू अरविंद मामनिया यांनी स्वीकारला.

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. माझगाव डॉकमध्ये नोकरी करत असताना अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९९२ मध्ये भावांसह ‘दास ऑफशोअर’ कंपनीची स्थापना केली. आज ही कंपनी देशातील अग्रगण्य अभियांत्रिकी कंपन्यांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

## पूंछ (जम्मू) सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांनी घेतली राज्यपालांची भेट

मुंबई, दि. २३ : पूंछ या जम्मूच्या सीमावर्ती



भागातील युवक युवतींच्या एका शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची महाराष्ट्र लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. भारतीय सैन्यदलाच्या सद्भावना मोहिमेंतर्गत या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यपालांनी सर्व विद्यार्थ्यांची आपुलकीने चौकशी केली व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पाचपैकी तीन युवती राष्ट्रीय स्तरावरील हॉकी खेळाडू असून एका विद्यार्थिनीला भारतीय प्रशासकीय सेवेत जायचे असल्याचे तिने सांगितले. यावेळी मौलवी फरीद मलिक, शबनम परवीन, नवाझ मेहमूद, उमर अब्दुल्ला खान, मुबशीर अहमद, शाहिस्ता मजीद, आदिल मजीद, शबीना परवीन व नसीम फातिमा हे उपस्थित होते.

## एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी व्यापक धोरण राबविणार - मंत्री आदिती तटकरे

मुंबई, दि. २३ : राज्यातील अंदाजे ५० ते ५५ लाख एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले. महिला व बाल विकास विभाग, मुंबई शहर यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात ‘एकल महिला दिन’ तसेच प्रस्तावित ‘एकल महिला धोरण’ यानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.

यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी एकल महिला धोरणाचे महत्त्व, कार्यशाळेची उद्दिष्टे आणि धोरण निर्मितीची प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेत विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, विभागाच्या लाभार्थी महिला तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, महिला धोरण आणि एकल महिला धोरण हे काळानुरूप बदलणारे व लोकाभिमुख असेल. महिलांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना, अभिप्राय आणि गरजांच्या आधारे त्यामध्ये आवश्यक बदल करण्यात येतील.

## तरुणांनी स्व-नियंत्रणातून व्यसनापासून दूर राहावे न्यायाधीश व्ही. एन. गिरवलकर

लातूर दि. २३ जून : तरुणाई ही कोणत्याही राष्ट्राची खरी संपत्ती असून स्व-नियंत्रणातून तरुणांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूरचे सचिव न्यायाधीश व्ही. एन. गिरवलकर यांनी केले.



महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील आय. क्यू.ए.सी., समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर, जिल्हा वकील संघ, लातूर आणि आयुष्यमान व्यसनमुक्ती केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमली पदार्थाच्या गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधात आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित एका विशेष कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे होते, तर विचारपीठावर संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, जिल्हा वकील मंडळाचे सचीव ॲड. जी.सी.येरटे, सहसचिव ॲड.एस.आर. धायगुडे, सदस्य ॲड.जी.जे.मिटकरी, उपमुख्य न्याय रक्षक ॲड.जी.जे.मिटकरी, मुख्य मार्गदर्शक ॲड.स्नेहा शिनगारे, डॉ. संजय पाटील, डॉ.जावेद अत्तार, सलीम पठाण, प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि संस्था कायदेशीर सल्लागार ॲड.शेखर हविले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलताना न्यायाधीश व्ही. एन.गिरवलकर म्हणाले की, व्यसनाधीनता हा व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्यासमोर एक मोठे आव्हान आहे. अमली पदार्थाच्या सेवनातून व्यक्ती कुटुंब व समाज व्यवस्था ही संपूर्णपणे उध्वस्त होताना दिसत आहे अशावेळी तरुणांनी विवेक बाळगून व्यसनाच्या आहारी न जाता व्यसनांवर मात केली पाहिजे. अमली पदार्थांचे होणारे उत्पादन आणि खरेदी-विक्री यावर कायदेशीर बंधने असले तरी हा अवैध व्यापार रोखण्यासाठी तरुणांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले

यावेळी बोलताना ॲड.स्नेहा शिनगारे म्हणाल्या की, व्यक्तिगत आरोग्य, समाज व्यवस्था आणि कायद्यासमोर व्यसनाधीनता एक आव्हान म्हणून उभे आहे. तरुणाईत विद्यार्थी ताणतणापासून दूर राहणे, फॅशन आणि मौजमजा याकरिता अमली पदार्थांचे सेवन करतात त्यामुळे वैयक्तिक शरीर, कटुंब व्यवस्था, समाज व्यवस्था आणि राष्ट्र यावरही अमली पदार्थाचे सेवनाचा परिणाम होतो. तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचे धैर्य बाळगले पाहिजे, व्यसनाधीन व्यक्तीचा तिरस्कार करण्यापेक्षा स्नेह, प्रेम आणि समुपदेशनाने त्यात बदल केला पाहिजे त्यामुळे सुदृढ राष्ट्र निर्माण होईल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी बोलताना डॉ.जावेद अत्तार म्हणाले की, मानवी संवेदना भान हरवून सोडणारी कोणतीही गोष्ट म्हणजे अमली पदार्थ होय. देशातील तरुणांनी व्यसनांच्या मागे लागून आपले सामर्थ्य हरवून बसले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण एकलकोंडी होऊन आत्महत्येला प्रवृत्त होत आहेत. व्यसनाधीनता ही एक साखळी असून त्यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशन आणि औषध उपचार हे मार्ग आहेत त्यामुळे व्यसनाधीन रुग्णाला वेळीच योग्य सल्ला आणि मार्गदर्शन प्राप्त झाल्यास तो बरा होऊ शकतो असेही ते म्हणाले

अध्यक्षकीय समारोपात सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, सर्व धर्म आपल्याला आदर्श आचरण सांगतो. निसर्गाने दिलेल्या साधनसंपत्तीचा यथायोग्य वापर करून निसर्गातील ऊर्जा आपण स्वीकारली पाहिजे. एकलकोंडेपणा टाळून चांगल्या व्यक्तीच्या आणि पुस्तकाच्या सानिध्यात आपण राहिले पाहिजे. ताणतणावांना सामोरे जाण्यासाठी आपण दररोज योग साधना केली पाहिजे त्या मार्गातून मन स्थिर राहून अमली पदार्थांच्या सेवनापासून दूर राहते. यासंदर्भात कायदे अनेक आहेत पण या कायद्याची अंमलबजावणी अधिकाधिक कठोर व सुव्यवस्थेत झाल्यास व्यसनाधीनतेवर आळा बसेल असेही ते म्हणाले

कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर मनोगत प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ.मनोहर चपळे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.आनंद शेवाळे, समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ. दिनेश मौने, प्रो.डॉ. संजय गवई, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो.डॉ.शिवप्रसाद डोंगरे, क्रीडा शिक्षक प्रा.आशिष क्षीरसागर, लेफ्टनंट डॉ. सुजित हांडीबाग, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, दि. २३ : राज्य शासनाने २०२५-२६ च्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ऑनलाईन आवेदने मागविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी २७ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून https://forms.gle/EgZ266-qNDxFJDZW8 या लिंकवर नावनोंदणी सुरू करण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळांमधील इच्छुक शिक्षकांनी दिनांक १० जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन आवेदन करावे, असे आवाहन शिक्षण संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांमुळेच समाज अणि राज्याचा तसेच राष्ट्राचा विकास होतो. अशा समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने गौरविले जात असल्याची माहिती शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

## कृषी पुरस्कार सोहळ्याचे राज्यपालांना निमत्रण - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई, दि. २३ : हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी



मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे पुरस्कार सोहळा होणार आहे. २०२३ व २०२४ या दोन्ही वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कार विजेत्यांचा सन्मान एकत्रितपणे करण्यात येणार असून, या सोहळ्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी निमंत्रीत केले आहे.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढ, शाश्र्वत शेती, नाविन्यपुर्ण कल्पना आणि कृषी विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था व कृषी क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रगतशील शेतकरी, कृषी संस्था आणि कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सर्व घटकांच्या योगदानाचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या पुरस्कारांमुळे कृषी क्षेत्रात नवे आदर्श निर्माण होतील आणि इतरांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्र्वास आहे असे ते म्हणाले.

## संजय राऊत, तुमच्या शिवराळ धमक्यांना महाराष्ट्र भीक घालणार नाही भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

मुंबई : मानसिक संतुलन पूर्णपणे बिघडलेल्या




जनाब संजय राऊत यांनी आज पुन्हा एकदा शिवीगाळ केली. लक्षात ठेवा, हे कायद्याचे राज्य आहे. तुमच्या धमक्यांना इथे भीक घातली जाणार नाही. तुमच्या धमक्यांना महाराष्ट्र घाबरत नाही. देवेंद्रजी फडणवीस या राज्याचे गृहमंत्री आहेत. मातोश्रीचे दरवाजे तुम्हीच बंद केलेत आणि आता आपल्याच निवडून आलेल्या खासदारांना शिवीगाळ करता? तुम्ही जितकी शिवीगाळ कराल तितकी जनता तुम्हाला मतरूपी शिव्या देऊन पुन्हा घरी बसवेल. जनतेने तुम्हाला याआधीही नाकारले, उद्याही नाकारतील. तुमच्या शिवीगाळीला वैतागलेले तुमचे लोक तुम्हाला सोडून जातात. येत्या काळातही याचे परिणाम तुम्हाला भोगावे लागतील, असे खडे बोल भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी सुनावले.

पैसा फेको, तमाशा देखो, ही संजय राऊत तुमचीच संस्कृती आहे. मुळात खासदार निधीचे काय झाले, हा प्रश्न तुम्हालाही लागू आहे. २५ वर्षापासून तुम्ही राज्यसभेचे खासदार आहात. तुमच्या खासदार निधीतून तुम्ही महाराष्ट्राच्या हिताचे एकतरी काम केले का? एकतरी शाळा बांधली का? एकतरी रस्ता केला का?, याचा हिशोब आधी द्या आणि मग इतरांना निधीबद्दल प्रश्न विचारा. मुळात एकनाथजी शिंदे यांच्यासोबत असलेले खासदार विकासासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून एनडीएसोबत आलेत. तुम्ही मात्र हिंदुत्वादाशी प्रतारणा केली, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी केली आणि काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसला, हे ध्यानात ठेवा आणि आधी तुमच्या निधीचा हिशोब आधी द्या, अशी मागणी श्री. बन यांनी केली.

श्री. बन पुढे म्हणाले, टक्केवारी घेणे ही उबाठा गटाची आणि संजय राऊत तुमची परंपरा आहे. मराठी माणसाला बेघर करण्यासाठी टक्केवारी घेतली. पत्राचाळ घोटाळा करून तुम्ही मराठी माणसाला लुटल्याने खासदारांची ठेकेदारी, टक्केवारी काढण्याच्या भानगडीत पडू नका. उलट कोविडच्या काळात ठेकेदारीमधून सर्वाधिक टक्केवारी घेण्याचे काम तुम्ही आणि तुमच्या पक्षाने केल्याचे महाराष्ट्राने पाहिल्याने टक्केवारीची भाषा तुम्हाला शोभत नाही. खिचडीतले आणि कोविडमधले कंत्राटही तुम्ही सोडले नाही. त्यामुळे टक्केवारीची भाषा तुम्ही करू नका. २०२९ पर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून जाणार आहे आणि या पाण्यात संजय राऊत हे काँग्रेसमध्ये वाहून जाणार हे नक्की. तुम्ही राहुल गांधींच्या मांडीवर जाऊन बसलेले असाल. तुम्ही उद्धव ठाकरेंना धोका देणार आहात. फक्त आणि फक्त खासदारकी मिळवण्यासाठी तुम्ही आपला गट काँग्रेसच्या दावणीला बांधला आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे सातत्याने नरेंद्रजी मोदी, देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर टीका करताहेत. पण विधान परिषदेच्या निवडणुकीला काँग्रेसची पळता भुई थोडी झाली. काँग्रेसचे अनेक नगरसेवक फुटले. हर्षवर्धन सपकाळजी, एकदा आरशात आपले तोंड पहा. कशा पद्धतीने तुमच्याच नगरसेवकांनी, तुमच्याच जिल्हा परिषद सदस्यांनी मत न देता तुमच्या तोंडाला काळे फासले ते दिसेल, असे श्री. बन यांनी सुनावले.

## 'अमृत मानस मित्र' प्रशिक्षणातून मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी १५ दिवसांचे मोफत प्रशिक्षण मिळणार

मुंबई, दि. २३ : विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृत मानस मित्र' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येत आहे. पहिल्या बॅचसाठी अर्जदारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी हा उपक्रम महत्त्वाची संधी ठरणार आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे ही महाराष्ट्र शासनाची अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय ऐकणे, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मानससामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत व महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

पुणे येथे प्रथम १५ दिवसांचे ऑफलाइन प्रशिक्षण,इंटरॅक्टिव्ह सत्रे, केस स्टडीज, प्रात्यक्षिक उपक्रम आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर एक महिना प्रॅक्टिकल फिल्ड एक्सपोजर (यात जिल्हा पातळीवर एका शाळा महाविद्यालयाला जोडून देण्यात येईल), त्यानंतर ३ ते ५ महिने प्रत्यक्ष व्यवसायासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेमार्फत नियमित मॉनिटरिंग, मेंटरिंग, ऑनलाइन सत्र आणि प्रत्यक्ष अडचणीचे निवारण **(पान ४ वर)...**

# पावसाळा आणि शेतकरी !

## संपादकीय...

पावसाळा हा भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा मानला जातो. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने येथे शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. देशातील बहुसंख्य शेतकरी आजही पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे पावसाळा आणि शेतकरी यांचे नाते अतूट आहे. पाऊस वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पडला तर शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित होतात.

चांगल्या पावसामुळे पिकांची वाढ उत्तम होते. शेतातील हिरवळ मनाला आनंद देणारी असते. पावसाच्या आगमनाने शेतकरी नव्या उत्साहाने कामाला लागतो. बी-बियाणे, खते आणि मशागतीची तयारी सुरू होते. खरीप हंगामाची सुरुवात पावसाळ्यातच होते. भात, बाजरी, ज्वारी, सोयाबीन, कापूस यांसारखी पिके पावसावर अवलंबून असतात.

पाऊस चांगला झाला तर उत्पादन वाढते. उत्पादन वाढल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढते. ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते. बाजारपेठांमध्ये व्यापार वाढतो. देशाच्या अन्नसुरक्षेसाठीही चांगला पाऊस आवश्यक असतो. मात्र पावसाळा नेहमीच सुखद असेल असे नाही. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते.

अवकाळी पाऊसही शेतकऱ्यांसाठी संकट ठरतो. पावसाचे अनियमित स्वरूप शेतीला मोठा फटका देते. अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली जातात. जमिनीची धूप होते. नद्यांना पूर येतात. शेतीचे मोठे नुकसान होते.

दुसरीकडे कमी पाऊस पडल्यास पिकांना पाणी मिळत नाही. दुष्काळामुळे उत्पादन घटते. शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढतो. त्यांच्या आर्थिक अडचणी अधिक गंभीर बनतात. हवामान बदलाचा परिणामही शेतीवर दिसून येत आहे. पावसाचे वेळापत्रक अनिश्र्चित होत आहे. यामुळे शेतीचे नियोजन करणे कठीण झाले आहे. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची गरज भासते. जलसंधारणाचे महत्त्व वाढले आहे.

शेततळी, बंधारे आणि पाणीसाठ्यांची निर्मिती आवश्यक आहे. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या पद्धती उपयुक्त ठरतात. पावसाच्या प्रत्येक थेंबाचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. सरकारनेही शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. पीकविमा योजना त्यातील एक महत्त्वाची योजना आहे. कृषी सल्ला आणि हवामान अंदाज उपलब्ध करून दिले जात आहेत.

तरीही अनेक शेतकरी अडचणींना सामोरे जात आहेत. शेतकऱ्यांचे जीवन संघर्षमय असते. ते निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असतात. पाऊस हा त्यांच्या आशा-आकांक्षांचा आधार असतो. पहिला पाऊस पडला की शेतकरी आनंदित होतो. त्याच्या चेहऱ्यावर समाधान झळकते.

कारण पावसातच त्याच्या भविष्यातील स्वप्ने दडलेली असतात. शेतीचे यश पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. म्हणूनच पावसाळा हा शेतकऱ्यांसाठी केवळ ऋतू नसून जीवनाचा आधार आहे. शेतकरी समृद्ध झाला तर देश समृद्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण राबवणे आवश्यक आहे. पाणी व्यवस्थापनाला प्राधान्य दिले पाहिजे.

हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयारी हवी. शाश्र्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र सक्षम असणे आवश्यक आहे.

पावसाळा आणि शेतकरी यांचे नाते भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेले आहे. हे नाते जपणे आणि बळकट करणे ही काळाची गरज आहे. चांगला पाऊस, आधुनिक शेती आणि योग्य नियोजन यामुळे शेतकरी सक्षम होईल. शेतकरी सक्षम झाला तर देशाची प्रगती अधिक वेगाने होईल.

म्हणूनच पावसाळा आणि शेतकरी हे एकमेकांचे अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या सुदृढ नात्यातच भारताच्या विकासाचे भविष्य दडलेले आहे.

# पाऊस लांबला; बळीराजाची चिंता वाढली

यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. अल निनोमुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे.

सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो.

पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्र्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो. देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो.

दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्र्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही.

याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले. बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# सत्ताधारी पक्ष एकनिष्ठ आणि स्वच्छ विचारसरणीचे आहे असे म्हटल्या जाते ;तर फोडाफोडीचे राजकारण कशाला?

सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात पक्ष फोडा आणि राज करा असा फार्मुला सुरू झालेला दिसून येतो.कारण पुढील संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ८५० खासदारांच्या विधेयकाला मंजुरी मिळावी यासाठी राज्यसभेत व लोकसभेत खासदारांची संख्या अपुरी पडत आहे.याच उद्देशाने सरकारने पक्ष फोडा आणि राज करा अशी रणनीती आखल्याचे स्पष्ट दिसून येते.कारण सरकारला कल्पना आहे की, देशातील ७५ टक्के पेक्षा जास्त लोकप्रतिनिधीवर भ्रष्टाचाराचे किंवा अन्य गुन्हेगारीच्या आरोपाने लिप्त आहेत.अशा सर्वच खासदारांवर सरकारची नजर आहे.

अशा खासदारांना ईडी किंवा अन्य सरकारी यंत्रणेचा धाक दाखवून सत्ताधारी पक्ष आपल्या पक्षात किंवा वेगळा गट तयार करून प्रत्येक विरोधी पक्षात फूट पाडण्याचे दबावतंत्र सुरू आहे आणि हे काम सक्सेस सुध्दा होत आहे. त्याचप्रमाणे पक्ष सोडणारे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी म्हणतात की आम्ही सत्तेत नसल्याने सरकार आमच्या क्षेत्राचा फंड पुरेसा देत नाही त्यामुळे आम्ही सत्ताधारी पक्षात किंवा एनडीएमध्ये किंवा महायुतीत प्रवेश केला आहे किंवा करीत आहोत.काही लोकप्रतिनिधींजवळ भ्रष्टाचाराच्या माध्यमातून वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आहे त्यावर कोणतीही कारवाई होवू नये म्हणून एनडीए मध्ये किंवा महायुतीत प्रवेश केल्याचे दिसून येते आणि काही लोकप्रतिनिधी करोडोंची देवाणघेवाण करून सत्तेकडे वळतांना दिसतात.ही बाब देशाच्या १४० कोटी जनतेला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्याचप्रमाणे अनेक लोकप्रतिनिधीं स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षांतर करून नैतिकता, बांधीलकी आणि पक्षाबद्दलची निष्ठा गहाण ठेवून सत्तेकडे वळल्याचे दिसून येते आणि एनडीएमध्ये किंवा महायुतीत फुटुन जाणारे ७५ टक्के लोकप्रतिनिधी हे कॉग्रेसच्या विचारसरणीचे आहेत, कॉग्रेसची विचारसरणी एनडीएला किंवा भाजपाला कधीच पटली नाही मग सरकारने या ७५ टक्के लोकप्रतिनिधींना आपल्या जवळ का केले असाही प्रश्र्न उपस्थित होतो!

भाजपा पुर्वीही कॉग्रेसला वाईट समजायची आणि आजही समजते एवढे सर्व असतांना फोडाफोडीचे राजकारण करून सरकारला कॉग्रेस विचारसरणीचे लोक कसे काय चालतात? आजही सरकार महत्वाचे मुद्दे बाजूला सारून नेहरू-गांधी यांच्यावर चिखलफेक करून वारंवार देशातील जनतेला सांगतात की कॉग्रेसने गेल्या ६० वर्षांत काहीच केले नाही ही बाब कितपत योग्य म्हणावी!देशाने पक्ष-विपक्षाचा काळ पहाला यात अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी,व्ही.पी. सिंह, पी.व्ही. नहसिंहराव, मनमोहनसिंग, चंद्रशेखर,राजीव गांधी इत्यादी अनेक विभुतींच्या काळात पक्ष-विपक्ष सामंजस्याने कार्य करायचे व एकमेकांचे आचार-विचार आदानप्रदान करायचे.परंतु सध्याच्या परिस्थितीत सरकार विरोधकांच्या कोणत्याही बाबी ऐकण्यास तयार नसल्याचे दिसून येते. ही लोकशाहीला दृष्टीकोणातुन धोक्याची घंटा म्हणावी लागेल. कारण विरोधी पक्ष फुटुन एनडीएमध्ये गेला ते सरकारला चालते आणि दुधासारखे स्वच्छ होतात.परंतु विरोधकांनी उचलले प्रश्र्न चालत नाही ही कसली लोकशाही म्हणावी!ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल.पुर्वी रेल्वे, विमान वाहतूक, संरक्षण, अर्थ ,इत्यादी अनेक खात्यातमध्ये जर काही चुकीच्या घटना घडल्या किंवा दुर्घटना झाल्या तर संबंधित विभागाचे मंत्री नैतिक जबाबदारी स्वीकारून स्वतःहुन राजीनामा द्यायचे किंवा जनतेचा रोष पाहुन राजीनामा द्यायचे.परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात नीट पेपर लिक प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजले यात आतापर्यंत अंदाजे २० पेक्षा जास्त विद्यार्थीनी आत्महत्या केल्या तरीही शिक्षण मंत्र्यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून अजुनपर्यंत राजीनामा दिलेला नाही.

सरकारचे म्हणने आहे की, राजीनामा ही पद्धत आमच्यात नाही ही कसली लोकशाही! सोन्याचे भाव आसमानाला टेकले,महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही, आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत आहे ह्या सर्वच महत्वपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर आहे.परंतु यावरून लक्ष भटकवीण्यासाठी देशात मंदिर-मज्जीद,हिंदू-मूस्लीम वाद समोर करून १४० कोटी जनतेची सरकार दिशाभूल करीत असल्याचे दिसून येते. आणि ही सत्य परिस्थिती आहे.देशात अनेक ज्वलंत व गंभीर समस्या आहेत बेरोजगारी, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शैक्षणिक समस्या,वाढता भ्रष्टाचार, अत्याचार,वाढत्या जंगलतोडीमुळे अलनिनोची गंभीर समस्या,पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्य,करोडोंचे घोटाळे करून अनेक पुंजीपतीनी विदेशात पलायन केले त्याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे.अशा अनेक गंभीर समस्या १४० कोटी जनतेपुढे उभ्या आहेत. तरीही देशाच्या भोळ्याभाबड्या जनतेला मंदिर-मज्जीद नावाचे भुत घालून या सर्वच समस्या बाजूला सारून सत्तेत आपली पकड मजबूत करण्यासाठी देशात सरकारकडून फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. सरकारची कट्टर विरोधक ममता बॅनर्जी त्यांच्या पक्षाचे आचार- विचार सरकारला कधीच पटले नाही; परंतु फोडाफोडीच्या राजकारणातुन काही लोकप्रतिनिधी (खासदार)आपल्याकडे करून घेतले ते सरकारला १०० टक्के चालले ही कुठली नितीमत्ता म्हणावी! सध्याच्या परिस्थितीत देशात खुला राजकीय बाजार मांडल्याचा दिसून येतो.जनुकाय लोकशाही संपुष्टात आली की काय असे चित्र दिसत आहे.कारण सत्तेच्या लोभापोटी अनेक दिग्गज लोकप्रतिनिधी पक्षांतर करून सत्तेकडे वळतांना दिसतात म्हणजेच विकल्या जात आहे ह्या सर्वच बाबी लोकप्रतिनिधींकडुन कलंकित करणाऱ्या आहेत.

एकेकाळी प्रत्येक राजकीय पक्षांमध्ये विचारसरणी,पक्षांची बांधीलकी,पक्षासोबत एकनिष्ठपणा रहायची परंतु अलीकडच्या काळात राजकीय वर्तुळात घोडेबाजाराला मोठा ऊत आल्याचे स्पष्ट दिसून येते. लोकप्रतिनिधी सरेआम विकल्या जात आहे आणि जो सत्ताधारी पक्ष ज्या विरोधकांवर भ्रष्टाचाराचे मोठमोठे आरोप लावायचे आणि जेलमध्ये टाकण्याची भाषा करायचे त्या सर्वांनाच सरकार भ्रष्टाचाराबद्दलची क्लीन चिट देवून आपल्या पक्षात सहभागी करून घेत आहेत ही तर लोकशाहीची खुली थट्टा म्हणावी लागेल.आचार-विचारामध्ये विरोधाभास असु शकतो आणि असायला पाहिजे.

परंतु १४० कोटी जनतेसमोर धडाल लोकप्रतिनिधी विकल्या जात आहे ही १४० कोटी जनतेची थट्टाच म्हणावी लागेल.आजचा राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षाची नैतिकता, बांधीलकी, विचारसरणी विसरून सत्तेकडे पलायन करीत आहे हा लोकशाहीला मोठा धक्काच म्हणावा लागेल.सत्ताधारी पक्षाने आपली पकड मजबूत करण्यासाठी जनुकाय लोकशाही विरूद्ध बंड पुकारले की काय असे वाटत आहे.कारण सध्याच्या सत्ताधाऱ्यांना विरोधकांची विचारसरणी कधीच पटली नाही आणि पटणार सुध्दा नाही.कारण सरकारला मजबूत विरोधी पक्ष नकोच! याकरिता विरोधीपक्ष संपुष्टात आणण्यासाठी सरकारने फोडाफोडीचे राजकारण सुरू केले आहे आणि त्याच पध्दतीने सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून देशात फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे आणि यात त्यांना मोठ्या प्रमाणात यश सुध्दा मिळत आहे.

यामागचा सरकारचा एकच उद्देश असावा तो म्हणजे विरोधक संपुष्टात आणने.गेल्या १२ वर्षे अगोदर विरोधकांचा मानसन्मान व्हायचा.परंतु आता तोडा-फोडा राज करा अशी परिस्थिती सर्वत्र दिसून येत आहे.आज देशात सत्ताधाऱ्यांसोबत शेकडो भ्रष्टाचारी आहेत.एकेकाळी सत्ताधारी पक्ष ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावायचे तेच भ्रष्टाचारी आज सत्तेत सहभागी होवून जबाबदार पदावर विराजमान आहेत आणि दुधासारखे स्वच्छ झालेले दिसतात याला कोणती लोकशाही म्हणावी! जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

## खाशाबांना पद्मविभूषण व मला शिवछत्रपती पुरस्कार मिळावा - बंडा पाटील

कोल्हापूरः ऑलिम्पिक दिनानिमित्त पुण्यातील ध्रुवतारा




फाऊंडेशनकडून दिला जाणारा मानाचा चौथा खाशाबा जाधव पुरस्काराने ऑलिम्पिकपटू बंडा पाटील यांचा गौरव करण्यात करण्यात आला . देशाचे भूषण खाशाबा जाधव यांना पदम्विभूषण तर मला शिवछत्रपती पुरस्कार मिळाला पाहिजे अशी अपेक्षा बंडा पाटील यांनी व्यक्त केली

कोल्हापूरातील ऐतिहासिक जिल्हा परिषद संचालित मेन राजाराम हायस्कूल सभागृहात क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांच्या हस्ते बंडा पाटील यांना शाल. श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख हजार रूपयांने सन्मान करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक मनिष झंवर, रोहित मुसळे, क्रीडा अधिकारी अरूण पाटील, प्राचार्य गजानन खाडे, लेखक संजय दुधाणे , वस्ताद बाबा महाडिक, शहाजी सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय खो-खो खेळाडू सानिका चाफे, अमृता पाटील, श्रावणी पाटील, कुस्तीगीर पृथ्वीराज मोहिते, क्रीडा प्रशिक्षक भीमा भांदिगरे यांचाही या विशेष सत्कार करण्यात आला.

कोल्हापूरातील ऐतिहासिक मेन राजाराम हायस्कूलमध्ये १९५२ काळात राजाराम महाविद्यालय भरायचे. या महाविद्यालाच्या मुख्य सभागृहात खाशाबांचा कोल्हापरकरांनी नागरी सत्कार केला होता. याच ऐतिहासिक सभागृहात खाशाबा जाधव पुरस्कार समारंभ ऑलिम्पिक दिनीच्या निमित्ताने रंगला. यावेळी कोल्हापूरातील खाशाबांच्या आठवणींना उजाळा संजय दुधाणे देत नव्या पिढीतही खाशाबा घडावा अशी अपेक्षा टाळ्यांच्या गजरात व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना बंडा पाटील म्हणाले की आमचे आदर्श खाशाबांना नावाने मला पुरस्कार मिळाला हे माझे परमभाग्य आहे. मलाही ऑलिम्पिकपटू असताना शासनाने शिवछत्रपती पुरस्कार अजून दिला नाही. तो मिळावी हीच अपेक्षा आहे. क्रीडा उपसंचालक सुहास पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, कोल्हापूरातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी आम्ही कटिबध्द आहे. खाशाबांप्रमाणे अनेक क्रीडापटू घडण्यासाठी असे उपक्रम प्रेरणादायी आहे.

क्रीडा क्षेत्रातील जेष्ठ व निवोदित चार पिढींच्या उपस्थितीत खाशाबा जाधव पुरस्कार स्मरणीय झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुषमा पाटील यांनी केले तर आभार आरोग्यसेवक राजेंद्र मकोटे यांनी मानले.

## भाजपा शहर जिल्ह्याच्या वतीने भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉक्टर श्यामप्रकाश मुखर्जी यांना विनम्र अभिवादन

लातूर;भारतीय जनसंघाचे संस्थापक प्रखर राष्ट्रभक्त, श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा बलिदान दिन हा राष्ट्राच्या एकात्मतेसाठी दिलेल्या त्यांच्या संघर्षाची आणि त्यागाची आठवण करून देणारा दिवस आहे. त्यामुळे भाजपाच्या गांधी चौकातील कार्यालयात भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कवेकर यांच्या उपस्थितीत डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

लातूर यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नगरसेवक प्रदीप मोरे, रागिणीताई यादव, प्रेरणादायी होनराव ,भाजपा सरचिटणीस निखिल गायकवाड, संजय गीर, मंडळ अध्यक्ष गोपाळ वांगे ,दत्ता चेवले, संतोष तिवारी, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष प्रमोद गुडे,बाबा गायकवाड, धनंजय हाके नितीन कोरे, किसन बडगिरे, व्यंकटेश कुलकर्णी ,संतोष तिवारी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक प्रदिप मोरे म्हणाले की, जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणाऱ्या तरतुदींना डॉ. मुखर्जी यांचा ठाम विरोध होता. त्यांच्या मते जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून एका देशात दोन संविधान, दोन पंतप्रधान आणि दोन ध्वज असू शकत नाहीत. याच भूमिकेतून त्यांनी एक देश में दो विधान, दो प्रधान, दो निशान नहीं चलेंगे हा ऐतिहासिक नारा डॉ. मुखर्जी यांनी दिला होता. त्या काळात जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागत असे. या व्यवस्थेच्या विरोधात ११ मे १९५३ रोजी डॉ. मुखर्जी यांनी कोणतीही परवानगी न घेता जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केला. त्यानंतर श्रीनगर येथे त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. नजरकैदेत असतानाच २३ जून १९५३ रोजी त्यांचे अत्यंत रहस्यमय परिस्थितीत निधन झाले. भारतीय जनसंघ आणि भारतीय जनता पक्षाकडून हा दिवस 'बलिदान दिन' म्हणून स्मरणात ठेवला जातो. त्यामुळे त्यांचे विचार आत्मसात करून आजच्या कार्यकर्त्यांनी वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पवित्र स्मृतींना भारतीय जनता पार्टी लातूर शहर व लातूर जिल्ह्याच्या वतीने गांधी चौक येथील पक्ष कार्यालयात विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डां.मुखर्जीने पाहिलेले अखंड भारताचे स्वप्न भाजपाने साकार केले

अजित पाटील कव्हेकर

डॉ. मुखर्जी हे एक आदर्शवादी शिक्षणतज्ज्ञ, विद्वान, प्रख्यात वकील आणि स्वतंत्र भारताचे पहिले उद्योग व पुरवठा मंत्री होते. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याशी काही धोरणात्मक मुद्द्यांवर मतभेद झाल्यानंतर त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर १९५१ मध्ये त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. पुढे याच भारतीय जनसंघाचे रूपांतर भारतीय जनता पक्षात झाले.अनुच्छेद ३७० आणि ३५ अ ला त्यांचा प्रखर विरोध होता. जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणाऱ्या या तरतुदी राष्ट्रीय एकात्मतेस बाधक असल्याचे त्यांचे मत होते. राष्ट्रीय स्तरावर त्यांनी या विरोधाची मोठी चळवळ उभी केली.आणी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी पाहिलेले एक देश, एक संविधान आणि अखंड भारताचे स्वप्न भारतीय जनता पक्षाने ५ ऑगस्ट २०१९ रोजी अनुच्छेद ३७० आणि ३५ अ रद्द करून साकार केले असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

# शिवाजीनगर पोलिसांची कारवाई; ०५ गुन्ह्यांची उकल करून २ लाख १० हजार रुपयांच्या सहा मोटारसायकली जप्त, एक आरोपी जेरबंद

लातूर : लातूर जिल्ह्यातील वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने वाहनचोरीच्या पाच गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे. या कारवाईत सतीश सुभाष कदम (वय ३४ वर्षे, रा. चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून २ लाख १० हजार रुपये किंमतीच्या सहा मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.




लातूर शहर व परिसरात घडलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना शिवाजीनगर पोलिसांना आरोपीबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तात्काळ हालचाली करून संशयित आरोपीचा शोध घेत त्यास ताब्यात घेतले. आरोपीची कसून चौकशी केल्यानंतर वाहनचोरीच्या अनेक गुन्ह्यांबाबत महत्त्वपूर्ण माहिती समोर आली.

तपासादरम्यान आरोपीकडून शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील दोन, गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील दोन, लातूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एक तसेच आंध्र प्रदेश राज्यातील एक अशा एकूण पाच गुन्ह्यांमधील सहा मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त वाहनांची एकूण किंमत अंदाजे २ लाख १० हजार रुपये आहे.

या कारवाईमुळे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल होण्यास मदत झाली आहे. आरोपीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्याच्याकडे सखोल चौकशी सुरू आहे.

सदर कारवाई समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार संजय फुलारी, पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, किशोर माने, परमेश्र्वर अंकुलगे आणि नारायण शिंदे यांनी केली आहे.

# ऑपरेशन शोध-४ मध्ये लातूर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; १४ अपेहत मुलींसह १२१ हरवलेल्या व्यक्तीचा शोध

महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या निर्देशानुसार दि. ८ जून ते २२ जून २०२६ या कालावधीत राज्यभर राबविण्यात आलेल्या ऑपरेशन शोध-४ मोहिमेत लातूर पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने काम करत अपहरण झालेल्या मुली, हरवलेल्या महिला व पुरुष यांचा शोध घेण्यामध्ये मोठे यश मिळविले.

सदर मोहिमेचे महत्त्व लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना नियमित सूचना देत मोहिमेचा सातत्याने आढावा घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्ह्यात अपहरण झालेल्या एकूण १४ मुलींचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले असून त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

विशेष बाब म्हणजे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी ही मोहीम केवळ अपहरण झालेल्या मुलांच्या शोधापुरती मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील हरवलेल्या महिला व पुरुषांचाही शोध घेण्यावर भर देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मोहिमेदरम्यान ७३ हरवलेल्या महिलांचा व ३२ हरवलेल्या पुरुषांचा शोध घेण्यात पोलिसांना यश मिळाले.

याशिवाय, मोहिमेची व्याप्ती अधिक व्यापक करत जिल्ह्यात विविध ठिकाणी भटकणारी, मजुरी करत असलेली किंवा असुरक्षित परिस्थितीत आढळून येणारी अल्पवयीन मुले यांच्याकडेही विशेष लक्ष देण्यात आले. विटभट्ट्यांवर, हॉटेलमध्ये काम करताना अथवा सार्वजनिक ठिकाणी भटकताना आढळून आलेल्या अल्पवयीन मुलांची ओळख पटवून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश देण्यात आले होते.

या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याने अभिलेखावर नोंद नसलेल्या दोन अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे.

एकूणच, ऑपरेशन शोध-४ अंतर्गत लातूर पोलिसांनी अपहृत व हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी केलेले अथक प्रयत्न, संवेदनशील दृष्टीकोन आणि पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी घेतलेला नियमित आढावा यामुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबांना आपल्या हरवलेल्या आप्तांचा पुन्हा सहवास लाभला आहे. त्यामुळे लातूर पोलिसांची ही कामगिरी केवळ आकडेवारीपुरती मर्यादित न राहता अनेक कुटुंबांच्या जीवनात आनंद परत आणणारी ठरली आहे.

# राष्ट्रीय सुरक्षा, वैद्यकीय आणि संगीत क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या समाजसेवेच्या कार्याचा 'हिमांशू रॉय लिगसी' पुरस्काराद्वारे उचित गौरव - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. २३ : पोलीस दलामध्ये कार्यरत असताना हिमांशू रॉय यांनी राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रात केलेले कार्य सर्वपरिचित आहे. हिमांशू रॉय फाउंडेशनच्या वतीने संशोधित केलेले कर्करोगाच्या सुरुवातीच्या काळातील निदानासाठी 'हिमांशू रॉय कॅन्सर डिटेक्शन किट' कर्करोगातील उपचाराकरिता निश्र्चितच महत्त्वाचे ठरत आहे. हे कार्य त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राष्ट्रीय सुरक्षा, वैद्यकीय आणि संगीत क्षेत्रात दिल्या जाणाऱ्या 'हिमांशू रॉय लिगसी' पुरस्कारामुळे समाजाच्या सेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरवच होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित 'द हिमांशू रॉय लिगसी पुरस्कार वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल हिमांशू राय फाउंडेशनच्या संस्थापक भावना रॉय उपस्थित होत्या. हिमांशू रॉय यांच्या कार्याचा गौरव करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हिमांशू रॉय यांनी कर्करोगाशी लढा दिला. मात्र तो अयशस्वी ठरला. मुंबईतील गुन्हेगारी मोडीत काढण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. मुंबईतील लोकलमधील साखळी बॉम्बस्फोटाचा तपास आणि महाराष्ट्राच्या दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून त्यांनी केलेले कार्य राष्ट्र कधी विसरू शकणार नाही. प्रत्येक भूमिकेत त्यांनी आपल्या कार्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला. कर्करोगातील लवकर निदानासाठी प्रतिष्ठानने संशोधित केलेले किट कर्करोगातील उपचारांमध्ये वरदान ठरत आहे. हिमांशू रॉय प्रतिष्ठानच्या वतीने महाराष्ट्रात २० हजार लोकांना हिमांशू रॉय कर्करोग निदान कीटच्या माध्यमातून कर्करोगाच्या लवकर निदानासाठी लाभ मिळणार आहे. हे प्रशंसनीय कार्य असून यासाठी महाराष्ट्र शासनही प्रतिष्ठानला सर्वतोपरी सहकार्य करेल. राज्य शासनाने कर्करोगाविरुद्ध लढाईसाठी मोठी मोहीम सुरू केली आहे. लवकर निदान आणि माफक उपचार देण्याचे कार्य करण्यात येत आहे. या मोहिमेचाच भाग समजून प्रतिष्ठानच्या कार्याला जोडून घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गंधर्व संगीत महाविद्यालय आणि डॉ. अश्र्विनी भिडे - देशपांडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच वैद्यकीय क्षेत्रात डॉ. झरीर उदवाडिया आणि डॉ. शेखर भोजराज यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रातील पुरस्कार मरणोपरांत शहीद तुकाराम गोपाल ओंबळे यांना त्यांच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील अजमल कसाब याला जिवंत पकडण्याच्या अतुलनीय कार्यासाठी देण्यात आला. त्यांची मुलगी वंदना ओंबळे - पटणी यांनी पुरस्कार स्वीकारला.

हिमांशू रॉय फाउंडेशनच्या रुग्ण सेवेत कार्यरत असलेल्या अमिताभ शहा, ऋषभ शहा यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मनोरंजन, वैद्यकीय, बांधकाम, प्रशासन क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## लातूर तालुक्यात मुरुड बु. येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून प्रारुप अधिसूचना प्रसिद्ध

लातूर, दि. २३ : लातूर तालुक्यामध्ये नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी मिळाली असून या कार्यालयाचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्र्चित करणारी प्रारूप अधिसूचना आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी रोहिणी नरहे-विरोळे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या नियमांनुसार ही प्रारूप अधिसूचना जारी केली आहे. यानुसार मुरुड बु. येथील अपर तहसीलदार अधिकारी यांच्याकडे लातूर तहसीलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ किंवा त्या-त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये त्यांच्याकडून नेमून दिलेल्या क्षेत्रासाठी प्रत्यार्पित करण्याचे योजिले असल्याचे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

या अधिसूचनेनुसार मुरुड बु. येथील ग्रामपंचायत इमारत किंवा ग्रामसेवक क्वार्टर येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालयाचे मुख्यालय असणार आहे. या नवीन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ३ महसूल मंडळे समाविष्ट करण्यात आली असून यामध्ये मुरुड बु., चिंचोली (ब.) आणि तांदुळजा या मंडळांचा समावेश आहे. या तिन्ही मंडळांतर्गत येणारे एकूण १८ साझे आणि ४३ गावे, वाड्या व तांडे या कार्यालयाच्या अखत्यारीत राहतील. या नवीन रचनेमुळे तहसीलदार लातूर यांचे महसूल संहितेअंतर्गत असलेले सर्व अधिकार व कर्तव्ये आता मुरुडच्या अपर तहसीलदारांकडे त्यांच्या क्षेत्रापुरती प्रत्यार्पित केली जाणार आहेत.

या प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप अधिसूचनेबाबत नागरिकांना काही हरकती किंवा सूचना मांडायच्या असल्यास, त्यांनी दिनांक ७ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी कार्यालय, मेन रोड, तहसील कार्यालयासमोर, लातूर येथे समक्ष हजर राहून त्या सादर कराव्यात, जेणेकरून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना पुढील कार्यवाहीसाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नरहे-विरोळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## गतिरोधकावर स्कूटी आदळल्याने महिलेचा मृत्यू; वाहतूक नियमांचे पालन आणि हेल्मेटचा वापर जीवनरक्षक

तुळजापूर-औसा मार्गावरील उजणी येथील पुलाजवळ झालेल्या दुचाकी अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी भादा पोलीस ठाण्यात निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १८ जून रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अंजली गणेश नकाते (रा. मंगळवेढा, जि. सोलापूर) या ज्यूपीटर स्कूटी (क्र. चक २४ उउ ९८७६) वर मागे बसून प्रवास करत होत्या. त्यावेळी चालक सचिन सुग्रीव यादव (रा. चांडेश्र्वर, ता. जि. लातूर) याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्याने उजणी येथील पुलाजवळील गतिरोधकावर स्कूटी आदळली. या धडकेत अंजली नकाते या दुचाकीवरून खाली पडल्या व त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांनी हेल्मेट परिधान केलेले नव्हते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी हेल्मेटचा वापर केला असता तर त्यांचा जीव वाचू शकला असता.

या घटनेप्रकरणी नागनाथ दगडू बळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भादा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६(१), २८१, १२५(अ) व १२५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अमलदार कांबळे करीत आहेत.

दुचाकी चालविताना तसेच मागे बसलेल्या व्यक्तीनेही मानांकित हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मृत्यू ओढवतात. हेल्मेटचा वापर केल्यास अशा दुखापतींची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.तसेच वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे, रस्त्यावरील गतिरोधक, वळणे व पुलांजवळ विशेष काळजी घेणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि सुरक्षित अंतर राखणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी आहे. काही क्षणांचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबासाठी दुःखद ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## 'अमृत मानस मित्र' प्रशिक्षणातून मानसिक...

**(पान २ वरुन) :** आणि मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष व्यावसायिक सहाय्य असे सर्वसाधारण स्वरूप आहे. संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे दिले जाईल. त्याचप्रमाणे अमृतमार्फत विविध तज्ञ मार्गदर्शकाचे वेळोवेळी अनुभवाधारित प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि सहकार्य मिळणार आहे.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच) च्या तज्ज्ञांकडून नियमित ऑनलाइन मार्गदर्शन दिले जाईल. यामध्ये -

नियमित ऑनलाइन सुपरव्हिजन, मेंटरिंग सत्र, प्रत्यक्ष कामातील अडचणींचे निराकरण व्यावसायिक मार्गदर्शन कौशल्य वृद्धीसाठी सातत्यपूर्ण सहाय्याचा समावेश असेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) नुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेवर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाची तरतूद आहे.

अमृत मानस मित्र उपक्रमात मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्य करण्याची संधी, मानसिक आरोग्य क्षेत्रातील रोजगारक्षम कौशल्ये, सामाजिक संस्थांमधील रोजगाराची संधी आणि व्यावसायिक नेटवर्किंग अशा विविध संधी उपलब्ध आहेत.

खालीलपैकी कोणतीही पदव्युत्तर पदवी असलेले अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवार अर्ज करू शकतात.

एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र ; एम.ए./एम.एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र ; मास्टर ऑफ सोशल वर्क (एमएसडब्लू).

या क्षेत्रात पूर्वीपासून कार्यरत व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

अमृत मानस मित्र हे प्रशिक्षण अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी पूर्णपणे मोफत आहे. तथापि प्रशिक्षणासाठी आवश्यक निवास, भोजन व राहण्याची व्यवस्था उमेदवारांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

https://mahaamrut.org.in/या संकेतस्थळावर सर्व आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करावा. पात्र उमेदवारांच्या अर्जाची छाननी करून, ओरिएंटेशन सत्र आणि इतर आवश्यक परीक्षा/ मुलाखत घेऊन, पात्र व योग्य उमेदवारांची नावे निश्र्चित करण्यात येतील.

या क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊन, तसेच प्रथम येईल त्यास प्राधान्य या तत्त्वानुसार उमेदवारांची नावे निश्र्चित करण्यात येतील.

पहिल्या बॅचसाठी अर्जदारांना २९ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894